MHPU090046502025

दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१०/२०२०
अमित बाबासाहेब कदम
विरुध्द
श्रीमती जयश्री बाबासाहेब कदम

## दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, पिंपरी, जिल्हा पुणे यांचे न्यायालयात

**श्री. अमित बाबासाहेब कदम**
वय – ३५ वर्षे, धंदा – नोकरी
रा. से.नं.२५, एल.आय.जी.कॉलनी,
निगडी, पुणे ४११०४४ ... **अर्जदार**

**--विरुध्द--**

१. **श्रीमती जयश्री बाबासाहेब कदम**
वय – ७० वर्षे, धंदा – गृहिणी
रा. से.नं.२५, एल.आय.जी.कॉलनी,
निगडी, पुणे ४११०४४

२. सौ. प्रणिता योगेश मुळे
वय – ४१ वर्षे, धंदा – गृहिणी
रा. सेक्टर नं.२४, जय ट्रेडर्सच्या मागे,
निगडी प्राधिकरण, पुणे ४११०४४ ... **जाबदेणार**

**अर्जदारातर्फे सुविद्य विधीज्ञ :श्रीमती श्वेता खोत**

## निशाणी क्रमांक १ खालील आदेश
## (दिनांक ०१/१०/२०२५ रोजी पारीत)

सदरचा अर्ज यातील अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ प्रमाणे वारस दाखला मिळणेबाबत दाखल केलेला आहे.

०२.      वरील अर्जदार यांनी त्यांचे अर्जात  शपथेवर कथन केले आहे की, **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे दिनांक १०/०८/१९८५ रोजी राहत्या घरी निधन झाले. त्यांना अर्जदार मुलगा व जाबदेणार क्र.१ पत्नी व जाबदेणार क्र. २ विवाहित मुलगी असे कायदेशिर वारस आहेत.

०३      सदर अर्जदार यांनी अर्जदार व जाबदेणार क्र.१ व २ शिवाय **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे अन्य इतर कोणी वारस आहे अगर कसे याबाबत **नि.क्र.०६** अन्वये जाहीरनामा–बेलीफ रिपोर्ट अर्जदाराचे घराच्या दर्शणी भागास दरवाज्याजवळ उदघोषणा नोटीस डकविण्यात आली. तसेच जाहीर नोटीस **नि.क्र.५अे** वर स्थानिक **दैनिक वृत्तपत्र पुण्यनगरी** यामध्ये **दि.१३.०४.२०२५ रोजी** प्रकाशीत करण्यात आली. जाहीर नोटीस स्थानिक दैनिक वृत्तपत्र व जाहीरनाम्याचे अनुषंगाने अर्जदाराच्या अर्जावर आक्षेप मागविण्यात आले.

०४.      तसेच अर्जदार यांनी साक्षीदार क्र.१ म्हणुन अर्जदार श्री. अमित बाबासाहेब कदम यांना **निशाणी क्र.१३** व साक्षीदार क्र.२ श्रीमती जयश्री बाबासाहेब कदम यांना **निशाणी क्र.१४** व साक्षीदार क्र.३ योगेश नारायण मुळे यांना **निशाणी क्र. १५** वर तपासले असता त्यांनी सरतपासणीचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करुन शपथेवर पुरावा दिला की,  मयत **कै. बाबासाहेब गणपत कदम** हे दि. १०/०८/१९८५ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार, जाबदेणार क्र.१ व २  हे **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही जवळचे कायदेशीर वारस नाहीत.

०५.      अर्जदार यांनी **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे मृत्युबाबत पिंपरी महानगरपालिका, पुणे यांनी दिलेले मृत्यु प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल केले आहे.

अर्जदार व जाबदेणार क्र.१ व २ यांचे आधारकार्डची छायांकित प्रती दाखल केल्या आहेत. पुण्यनगरी जाहिर नोटिस यास पुराव्या दरम्यान देण्यात आली. तसेच अर्जदार यांनी **निशाणी क्र.१६** वर पुरावा बंद पुरसीस दाखल केली आहे.

०६. दैनिक वृत्तपत्रातील जाहिरनामा **नि.क्र.५अे** , जाहीर नोटीस **नि.०६** तसेच जाहीरनाम्यानंतर प्रस्तुत अर्जाला कोणीही न्यायालयासमोर हजर होवून अर्जदार, जाबदेणार क्र.१ व २ हे **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे कायदेशीर वारस नाहीत असा आक्षेप घेतला नाही. या सर्व बाबी लक्षात घेता अर्ज नाकारण्यास कोणतेही सबळ कारण दिसुन येत नाही. त्यामुळे अर्जदार, जाबदेणार क्र.१ व २ हे मयत **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे कायदेशीर वारस असल्यामुळे त्यांना वारस दाखला देण्यात येतो व मी खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## आदेश

**अ.** अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

**ब.** अर्जदार व जाबदेणार क्र.१ व २ हे मयत **कै. बाबासाहेब गणपत कदम** यांचे केवळ औपचारीक कायदेशीर वारस आहेत.

**क.** यातील अर्जदार व जाबदेणार क्र.१ व २ यांनी योग्य तो न्यायालयीन मुद्रांक अदा करावा.

**ड.** सदरचा आदेश हा खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Digitally signed by SATYVATI SHARADCHANDRA CHAVAN
Date: 2025.10.06 12:05:30 +0530
सत्यमेव जयते

ठिकाण :–पिंपरी.
दिनांक :०१/१०/२०२५

(श्रीमती एस.एस.चव्हाण)
दिवाणी न्यायाधीश (क.स्तर),
पिंपरी, जि. पुणे.